पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/५/कावि/४३७/२०२०
दिनांक - ११/०८/२०२०

प्रति,
मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

**विषय** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०८/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **ऑगष्ट-२०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०८/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे ही विनंती.

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

### कार्यपत्रिका क्रमांक – ४७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **ऑगष्ट- २०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०८/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

अ) मा.विशेष महापालिका सभा क्रमांक - ४५ दिनांक १/६/२०२० (दु.२.३० वा.) व दि.४/६/२०२० (दु.२.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

### प्रश्नोत्तरे

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

-----

### मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे

**विषय क्रमांक १)** **संदर्भ – १)** मा.महापलिका आयुक्त यांचेकडील जा.क्र कक्षेका/स्था/२७६/२०२० दि.२३/०७/२०२०

राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, दि.13/03/2020 पासुन

लागू केलेला आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरूनमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये विषयांकित कामास मा.आयुक्त सो.यांनी खालीलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे.

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **लेखाशिर्ष** | **उप-लेखाशिर्ष** | **अंदाजपत्रकीय /प्रशासकीय मान्यता रक्कम** | **सन 2020-21 ची मुळ तरतूद** |
|---|---|---|---|---|---|
| 1) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये “कोरोना”(COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे. | स्थापत्य विभागाकडील विशेष योजना | “कोरोना (COVID-19)साठी स्थापत्य विषयक कामे करणे | 1,50,00,000 | 0 |
| 2) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडियम मैदानामध्ये “कोरोना” (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे. | स्थापत्य विभागाकडील विशेष योजना | “कोरोना (COVID-19)साठी स्थापत्य विषयक कामे करणे | 18,50,00,000 | 0 |

तरी उपरोक्त कामास वरीलप्रमाणे कार्योत्तर मान्यता देणे बाबत विचार करणे.

**विषय क्रमांक २)** **संदर्भ – १)** मा.महापलिका आयुक्त यांचेकडील जा.क्र फक्षेका/वि/कावि/२२२/२०२० दि.७/०८/२०२०

फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत COVID-19 आपत्कालीन उपाययोजना Isolation Bed Management (IBM) करीता म्हाडा इमरती म्हाळुंगे इंगळे, घरकुल व मनपा शाळामध्ये करणेत येत असलेल्या CCC साठी कुशल कामगार पुरविणेकामी प्रस्तावात नमुद

प्रमाणे येणा-या र.रू. २०,५१,०३७/- (अक्षरी र.रु. वीस लाख एक्कावन्न हजार सदतीस फक्त) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे बाबत विचार करणे.

----

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/४३७/२०२०
दिनांक : ११/८/२०२०
टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस् ) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.